
नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 20/12/2021 (सोमवार)

## The Cibo 72 हुक्का पार्लरवर धाड
## स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामिणची कारवाई

दिनांक 19/12/2021 रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक सावनेर उपविभागात पेट्रोलिंग करीत असतांना त्यांना खात्रीशीर गोपनीय माहिती मिळाली की, पो.स्टे.कळमेश्वर अंतर्गत मौजा गोंडखैरी शिवारातील नागपूर–अमरावती महामार्गावरील The Cibo 72 restaurant येथे अवैद्यरित्या दारूची विक्री व हुक्का पार्लर सुरू आहे. अशी माहिती मिळाल्याने स्थानिक गुन्हे शाखेचे पथक नमूद ठिकाणी धाड टाकुन कार्यवाही केली असता नमूद ठिकाणी दारू व हुक्क्याचे साहित्य ज्यामधे हुक्का पॉट, हुक्का चीलम, पाइप, ईत्यादी व वेगवेगळ्या प्रकारचे प्रतिबंधित सुगंधित तंबाखू आणी दारू असा एकूण कि. 8,900/–रु. चा मुद्देमाल मिळून आला. सदर कारवाही दरम्यान आरोपी क्र. 1. सुधीर विठ्ठलराव पोहनकर हॉटेल (मालक), वय 30 वर्ष, रा.वार्ड नं. 3, गोंडखैरी, ता.कळमेश्वर, जि. नागपूर, 2. रविकिरण किसनराव जामणिक (मॅनेजर), वय 39 वर्ष, वडधामना, ता.हिंगणा, जि. नागपूर यांचे विरोधात पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे महाराष्ट्र दारूबंदी कायदा व सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादन अधिनियम 2003 या कायद्याअंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्री विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक श्री राहूल माकणीकर, पोनि अनिल जिट्टावार स्था.गु.शा. यांचे मार्गदर्शनात स.पो.नी. राजीव कर्मलवार, जितेंद्र वैरागडे, पोहवा निलेश बर्वे, दिनेश आधापुरे, पो.ना. आशिष मुंगळे, किशोर वानखेडे, मपोना भावना ठाकरे यांनी केली.



## खून

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 09 कि. मी अंतरावर मौजा फेटरी जवळील हनुमान मंदीर येथे दिनांक 09/11/2021 चे 01.30 वा. ते 02.00 वा. दरम्यान सचिन अनिल शिंदे (मृतक), वय 24 वर्ष, रा. आय.सी.चौक हिंगणा रोड संगम जव्लेर्स यांचे घरी किरायने हा दि. 08/11/21 चे 17.00 ते दि. 09/11/21 रोजी 06.00 वा. दरम्यान पोलिस स्टेशन कळमेश्वर हददीतील मौजा गोन्नी येथुन बेपत्ता झाला होता. त्याबाबत पोलिस स्टेशन कळमेश्वर येथे मृतक व्यक्तीचे वडील अनिल शिंदे यांनी दिलेल्या तक्रारीवरून बेपत्ता इसम नोंदवही क्रमांक 75/21 अन्वये दि. 09/11/21 रोजी नोंद करण्यात आलेली होती. सदर बेपत्ता इसमाच्या चौकशी दरम्यान साक्षीदार नामे दयाराम झामसिंग याच्याकडे केलेल्या चौकशी दरम्यान आरोपी नामे– 1) लोकेश भगवान काळबांडे वय 32 वर्षे, 2) आर्दश अशोक हुमनेकर, वय 22 वर्षे, रा. फेटरी यांनी संगनमत करून बेपत्ता इसम सचिन शिंदे याला जबरदस्तीने मोटारसायकल बसवुन नेवुन त्याचा खुन केले.

सदर प्रकरणी सर तर्फे पोलिस उपनिरीक्षक श्री. शिवाजी विक्रम मुंडे, पोलिस स्टेशन कळमेश्वर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 364, 302, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री. प्रविण मुंडे मोक्र. 9970094709 हे करीत आहे.

## जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 10 कि.मी अंतरावर फिर्यादीचे राहत्या घरासमोर रोडवर मौजा महाराजपुर येथे दिनांक 19/12/2021 चे 18.00 वा. ते 18.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– उमेश राधेश्याम कुभंरे वय 34 वर्ष रा. महाराजपुर हा त्याचे घरासमोरील रोडवर उभे असलेले आरोपी क्र. 1) अशोक शामराव समर्थ, वय 55 ते 60 वर्ष व 2) लक्ष्मण मनीराम राजुरकर, वय 40 वर्ष, दोन्ही रा. महाराजपुर तह. रामटेक जि. नागपुर यांना ''तुम्ही माझ्यावर चोरीचा आरोप का लावला''? हे विचारण्याकरीता गेला असता आरोपी क्र 2 याने फिर्यादीस पकडले व आरोपी क्र 1 याने आपले जवळील गुप्तीने फिर्यादीचे पाटीवर कबंरेवर व पोटावर वार करून गंभीर जखमी केले.

सदर प्रकरणी फियादी उमेश राधेश्याम कुभंरे वय 34 वर्ष रा. महाराजपुर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 307, 34 भादंवि. सहकलम 3(1)(आर) अ.जा.ज.अ.प्र कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी क्र. 2 ला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास उपविभागिय पोलीस अधिकारी श्री राजेंद्र शंकरराव चव्हाण रामटेक विभाग हे करीत आहे.

## अपघातात मृत्यू

पो.स्टे. बोरी :– अंतर्गत 08 कि. मी. अंतरावरील मौजा ढोलपेठ नागपूर वर्धा रोड येथे दिनांक 19/12/2021 चे 16:30 वा. ते 16.45 वा. दरम्यान फिर्यादी नामे– विक्रांत मधुकरराव धोटे वय 50 वर्ष रा. हिंदुस्तान कॉलनी अमरावती रोड नागपुर हे आपले एमएच– 31/एफए– 5045 क्रमांकाच्या कारने आपले परिवारासह नागपुरला जात असता समोर असलेले एमएच– 49/बीके– 8713 क्रमांकाच्या कारचे चालक आरोपीने आपले वाहन भरधाव वेगाने चालवुन डाव्या साईडने पायदळ जाणाऱ्या अज्ञात इसम वय अंदाजे 45 ते 50 वर्ष याला धडक मारल्याने जखमी मरण पावला. सदर कार फिर्यादीचे गाडीवर आदळुन फिर्यादीचे गाडीचे नुकसान केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री सतिश सोनटक्के मो नं 8329590482 हे करीत आहे.

# अकस्मात मृत्यू

पो.स्टे. खापा :– अंतर्गत 07 कि.मी. मौजा खुबाळा कुष्णाजी खुबाळकर यांच्या शेतात येथे दिनांक 20/12/2021 चे 06.00 वा. दरम्यान सौ कुन्ती रेवदास जाधव (मृतक), वय 28 वर्षे, रा. ग्राम दोगलाको ता. कन्नोड, जि. देवास (म.प्र.) ह.मु. हि विहरीतील पाणी काढण्याकरीता गेली असता तिचा तोल विहरीत जाउण बादली सह विहीरीत पडून ती पाण्यात बुडून मरण पावली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– रेवदास पठानसिंग जाधव, वय 33 वर्षे, रा. ग्राम दोगलाको ता. कन्नोड जि देवास (मप्र) ह.मु खुबाळा, कृष्णाजी खुबाळकर यांच्या शेतात यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापा येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोउपनि श्री चिश्तीया मो. नं 8805048777 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर